**<u>पुढील सरतपास प्रतिवादी क्र.५ तर्फे श्री.डी.एल.घोगरे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**१२.** माझे पती यांना अर्धांगवायु, मधुमेह, रक्तदाब असे आजार होते. लातूर, पुणे, औरंगाबाद या ठिकाणी त्यांच्यावर उपचार झाले. मी व माझा मुलगा बाजीराव त्यावेळी त्यांच्यासोबत होतो. दवाखान्याचा खर्च मी केला. दवाखान्याच्या पावत्या मी दाखल केलेल्या आहेत. माझे नाव जनाबाई उर्फ चित्रलेखा आहे. मी नि.क्र.४९ सोबत दाखल केलेल्या विविध हॉस्पीटलकडील खर्चाच्या पावत्या, डायग्नोस्टीक सेंटरच्या पावत्या यांची रक्कम मी दिलेली आहे. त्या पावत्यांवर माझ्या सहया आहेत. त्या पावत्या मला दवाखान्यातून मिळालेल्या आहेत. वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून मी दाखल केलेला न्यायालयातील अर्ज त्यामध्ये त्रुटीं असल्याने काढून घेतला होता. प्रकरण मिटवून घ्यावे म्हणून कालीदास शंकरराव बोराटे माझ्या घरी आले होते. त्यासाठी औरंगाबादला चला असे ते म्हणाले. मी आणि माझा मुलगा बाजीराव असे औरंगाबादला गेलो. माझा आणखी एक मुलगा मदन हा मुंबईहून औरंगाबादला आला. मनोज, कालीदास असे आम्हाला वादी अनुसयाबाई यांच्या घरी घेवून गेले. तेथे गेल्यावर तडजोड म्हणून त्यांनी काय लिहिले हे आम्हाला माहीत नाही, त्यावर त्यांनी आमच्या सहया घेतल्या व माझा अंगठा घेतला. ते वाचून दाखवले नव्हते. मला लिहिता-वाचता येत नाही. मला पतीने सही करायला शिकवले आहे. सध्या हात थरथरत असल्याने मी सहीसुध्दा करीत नाही. त्याविरुध्द मी पोलिसात अहमदपूर आणि लातूर येथे तक्रार केली. त्यांनी दाद घेतली नाही, म्हणून मी कोर्टात तक्रार दिली. कोर्टात तो खटला चालू आहे. त्याच्या नकला मी आज दाखल केलेल्या आहेत. आता मला नि.क्र.१४२/1 हा कागद दाखवला,

त्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१४३** देण्यात येते.

**उलटतपास वादीतर्फे श्री.डी.ए.साबणे वकील यांच्यामार्फत सुरु.**

**१३.** माझे शिक्षण झालेले नाही. मी घरकाम करते. तसेच, शेतीही करते. माझे माहेर मोरेवाडी, ता. अहमदपूर आहे. खरबवाडी ते मोरेवाडी हे अंतर ५ ते ६ किमी आहे. माझया वडिलांचे नाव माधवराव आप्पाराव मोरे असे आहे. माधवराव यांना किती बायका होत्या, हे मला माहिती नाही. माझ्या वडिलांना मुक्ताबाई, भागिरथाबाई आणि वत्सलाबाई अशा तीन पत्नी होत्या, हे मला माहिती नाही. माझया आईचे नाव वत्सलाबाई आहे. मी धरुन आम्ही पाच बहिणी आहोत. सगळयात थोरली देवूबाई, त्यानंतर गवळणबाई, त्यानंतर कौशाबाई, त्यानंतर मी व माझ्यानंतर शिवुबाई अशा आम्ही बहिणी आहोत. मला सख्खा भाऊ नाही. माझ्यानंतर दोन वर्षांनी शिवुबाईचा जन्म झाला. माझे वडील मोरेवाडीचे पाटील होते. हे खरे नाही की, माझे वडील जन्म-मृत्युच्या नोंदी ठेवत. मी सांगते की, त्यावेळी अशी प्रथा नव्हती.

**१४.** देवूबाईच्या पतीचे नाव व्यंकटराव आहे. व्यंकटराव आणि माझे शेतावरुन भांडण होते. मला त्या दाव्याचा नंबर आठवत नाही. गणपतराव जयवंतराव जगताप हे कोण आहेत, हे मला माहित नाही. गणपतराव व माझा वाद नाही, हे म्हणणे बरोबर आहे. अनुसयाबाईचा मोठा मुलगा कोण आहे, धाकटा मुलगा कोण आहे, हे मला माहित नाही. माझे लग्न झाले त्यावेळी मंगेश किती वर्षांचा होता, हे मला माहिती नाही. तो कोणत्या वर्गात शिकत होता, याची मला माहिती नाही.

**१५.** माझा मुलगा मदन हा नोकरी करतो. मदन हा एअरोनॉटीकल इंजिनिअर आहे, याची मला माहिती नाही. बाजीराव हा माझा दुसरा मुलगा संस्थेमध्ये शिक्षक आहे.

**१६.** सरतपासात नमूद केलेल्या घटनेमध्ये आम्ही औरंगाबादला गेलो

त्यावेळी मदन याने स्वत: बॉण्ड खरेदी केला. यास माझे सांगणे त्यासोबत मनोजही होता. हे खरे नाही की, त्या बॉण्डवर आम्ही राजी-खुषीने वाटणीपत्र तयार केले. हे खरे नाही की, त्या बॉण्डवर अनुसया ही पहिली पत्नी व मी दुसरी पत्नी असल्याचे व जमीन-जुमल्यांचे वाटप आणि पेन्शनचा अधिकार अनुसयाबाई हिचा राहिल असे लिहून दिले. नि.क्र.९९ या वाटपपत्राचा समावेश दाव्यामध्ये करण्यासाठी वादीने दावा दुरुस्तीचा अर्ज दिला होता, हे खरे नाही. तो दि.०८/१०/२०२४ रोजी दाखल केला, हे खरे नाही. दि.०८/१०/२०२४ रोजी तो अर्ज दाव्यात दाखल झाल्याचे पाहून लगेच आम्ही पोलीस ठाण्यात वादींविरुध्द तक्रार दिली. हे खरे नाही की, अर्जात तथ्य नसल्याने पोलिसांनी आमची दखल घेतली नाही. हे खरे की, दि.२४/१२/२०२४ रोजी आम्ही न्यायालयात फौजदारी खटला दाखल केला. फौजदारी खटल्याची अद्यापही न्यायालयाने दखल घेतली नाही व वादी व अन्य व्यक्तींना नोटीस काढलेली नाही, याबद्दल मला माहिती नाही. हे खरे की, त्याकामी अद्यापी फिर्यादीची पडताळणी झालेली नाही. पडताळणी करण्यासाठी चार ते पाच तारखा होवून गेल्या याची मला माहिती नाही. बॉण्ड फसवुन लिहून घेतला म्हणून बॉण्ड लिहिल्यानंतर लगेचच किंवा नजीकच्या काळात औरंगाबाद येथील पोलीस स्टेशनला मी तक्रार केली नाही. औरंगाबादहून आल्यावर लगेच अहमदपूर पोलीस स्टेशनला आम्ही तक्रारी अर्ज दिला नाही. या फसवणुकीबाबत वकिलांकरवी मी वादी व तिच्या मुलांना नोटीस दिलेली नाही.

**१७.** जयवंतराव यांच्या पहिल्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई आहे, याबद्दल मला माहिती नाही. त्यांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव हरीबाई आहे, याबद्दल मला माहिती नाही. हरीबाईला किती मुले हे मला सांगता येत नाही. हरीबाईला गणपत, पंडीत, भाऊसाहेब असे तीन मुलगे होते, यास माझे सांगणे की, माझे पती हे एकटेच चिरंजीव होते. जयवंतराव यांची पहिली पत्नी लक्ष्मीबाई मयत झाल्यानंतर हरीबाईचे नाव बदलून लक्ष्मीबाईच ठेवले, याबद्दल मला माहिती नाही. मोहनराव यांचा जन्म झाल्यावर लक्ष्मीबाई दोन वर्षांतच मयत झाल्या, याची मला माहिती

नियमीत दिवाणी दावा क्र.०७/२०१९
अनुसया वि. शासन व इतर
**प्रतिवादी क्र.५ तर्फे सा.क्र.१**
**(नि.क्र.१३७)**



नाही. हे खरे नाही की, मी मोहनरावची दुसरी पत्नी आहे म्हणून त्यांनी माझी आई वत्सलाबाई यांच्याकडून साडेसात एकर जमीन माझ्या नावे खरेदी करुन दिली. कौशाबाई, देवूबाई व गवळणबाई या माझ्या बहिणींनी मी व माझी आई वत्सलाबाई यांच्याविरुध्द या साडेसात एकर जमिनींबद्दल दावा केला होता, यास माझे सांगणे की, तो दावा फक्त माझी आई वत्सलाबाई हिच्याविरुध्द केला होता. त्या दाव्यामध्ये माझ्या बहिणींनी मी दुसरी पत्नी आहे, पहिली पत्नी हयात असताना असे खरेदीपत्र, मिळकत गिळकृंत करण्यासाठी केले असे वादपत्रात लिहिले होते, यास माझे सांगणे की, ते खोटेपणाने लिहिले होते. तो दावा रद्द झाल्यावर त्यांनी केलेल्या अपीलामध्ये पुन्हा त्यांनी असेच लिहिले होते, हे म्हणणे खरे नाही. शिवाजी महाविद्यालयात मी मोहनराव जगताप यांची पहिली पत्नी असल्याबद्दलचे वारसा प्रमाणपत्र दाखल केलेले नव्हते.

**उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

**स्वाक्षरीत/-**
(एस.एन.सरडे)

दिनांक २२/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.